मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पर्यावरण प्रेमींच्या साक्षीने ऐतिहासिक “रिव्हर सायक्लोथॉन”

## इंद्रायणी नदी स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी 51 हजार 300 हून अधिक सायकलपटू सहभागी : आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतील उपक्रमला तुफान प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी स्वच्छतेचा जागर संदेश देण्यासाठी रविवारी आयोजित करण्यात आलेल्या ‘रिव्हर सायक्लोथॉन 2025’ या भव्य उपक्रमाला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. वारकरी परंपरा आणि पर्यावरणसंवर्धनाचा संगम घडवणाऱ्या या उपक्रमात ‘शिव-शंभू यशोगाथा’ हा विशेष कार्यक्रम सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. शिवकालीन शौर्य, सांस्कृतिक वैभव आणि नदी संवर्धनाचा संदेश यांचा अनोखा मेळ यंदाच्या सायक्लोथॉनमध्ये पाहायला मिळाला.

‘स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’— धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक परिसरातून रविवार, दि. 23 नोव्हेंबर रोजी पहाटे 6 वाजता सायक्लोथॉनची सुरुवात झाली. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी आयोजित होणाऱ्या या उपक्रमाने यंदा नवा इतिहास रचला. यंदा सायक्लोथॉनचे 9 वे वर्ष होते. रणमर्द शिलेदारांचे संचलन, मर्दानी खेळ, ढोल-ताशांचा गजर आणि मशाल-दिवटी नृत्य यांच्या सादरीकरणांनी शिवराज्यकालीन पराक्रमाची जिवंत झलक उपस्थितांना अनुभवता आली. शिव-शंभू गर्जनेने परिसर दणाणून गेला.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, धनश्री हॉस्पिटलच्या संचालक यांच्यासह विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही ऐतिहासिक सायक्लोथॉन संपन्न झाली.



### तीन ट्रॅक, हजारोंचा सहभाग...

» पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सायक्लोथॉनमध्ये 5, 15 आणि 25 किमी अशा तीन ट्रॅकवर हजारोंनी सहभाग नोंदवला. अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे म्हणाले, “शिव-शंभू यशोगाथा ही केवळ सादरीकरणांची मालिका नसून आपला इतिहास आणि संस्कृती जपण्याची प्रेरणा आहे. हीच प्रेरणा निसर्गसंवर्धनाच्या कार्यात अधिक लोकांना जोडेल.”

“इंद्रायणी ही आपल्या संस्कृतीची जीवनधारा आहे. तिच्या स्वच्छतेसाठी मतभेद विसरुन सर्वांनी एकत्र येणं ही काळाची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला मान्यता दिली. हे या उपक्रमाचे यश आहे. 79 हजारांहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून नदी संवर्धनाचा लढा अधिक बळकट होईल. तमाम पिंपरी-चिंचवडकर, सोसायटी फेडरेशन आणि विविध स्वंयसेवी-संघटनांच्या सहभागामुळे ही विश्वविक्रमी सायक्लोथॉन यशस्वी होत आहे. यावर्षीची सायक्लोथॉन ‘स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’ ला समर्पित केली आहे. हजारो सायकलपटूंनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच स्मारकाला मानवंदना दिली. स्मारकाच्या उभारणीसाठी आम्हाला संघर्ष करावा लागला, अनेक आरोप झाले. आगामी काळात कोणताही आरोप सहन केला जाणार नाही. शहरासाठी शिव-शंभूंच्या कार्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन करतो.

-महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# मतदार यादीवर प्राप्त होणाऱ्या सूचनांची गांभिर्याने दखल घ्या : आयुक्त श्रावण हर्डीकर

## नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती सूचना आणि आक्षेपांची गांभिर्याने दखल घ्यावी असे निर्देश श्रावण हर्डीकर यांनी दिले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रारुप मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ठ होणा-या संबंधित विधानसभा क्षेत्रांच्या दिनांक १ जुलै २०२५ अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीवरुन महानगरपालिकेची प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी गुरुवारी २० नोव्हेंबर २०२५ रोजी मतदार यादी कक्ष तसेच आठ क्षेत्रीय कार्यालयात आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारण्यासाठी २७ नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली आहे. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती सूचना आणि आक्षेपांची गांभिर्याने दखल घ्यावी असे निर्देश निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले आहे.



महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांच्यासह स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, उप आयुक्त पंकज पाटील, डॉ. प्रदिप ठेंगल, संदिप खोत, सिताराम बहुरे, चेतना केरुरे, सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच प्रारुप मतदार यादी हरकत व सूचना कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

हरकत दाखल करण्यासाठी आलेल्या नागरिक तसेच पदाधिका-यांचे म्हणणे व्यवस्थितपणे ऐकून घ्यावे. संवेदनशीलतेने सर्व प्रक्रिया हाताळताना राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले.

# थेरगांव, काळेवाडीत अनधिकृत बांधकामांचा सपाटा...

## निवडणुकीच्या तोंडावर विनापरवाना बांधकामांचा जोर वाढला, महापालिकेच्या सुविधांवर येतोय ताण. क्षेत्रीय अधिकाऱ्याचे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या'ग' क्षेत्रीय कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकामे जोरात सुरु आहेत. थेरगांव, काळेवाडी, पिंपरी गाव अनधिकृत बांधकामाचे बांधली जात आहेत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिकारी हे निवडणूक कामात दंग असताना प्रभागात अनधिकृत बांधकामांचा धडाका सुरू आहे. एक-दोन गुंठ्याच्या भूखंडांवर पाच ते सहा मजली इमारत उभा राहत आहे. क्षेत्रीय अधिकारी हे बघ्यांची भूमिका घेत आहे. अनधिकृत बांधकामांवर कसलीही कारवाई न करता केवळ नोटिसीचा फार्स करत आहेत.

पिंपरी-चिंचवड हे राहण्यासाठी योग्य शहर म्हणून नागरिक मोठ्या प्रमाणावर पसंती देत आहेत. त्यामुळे गृहप्रकल्प व घरांची संख्या वेगाने वाढत आहे. शहरात सुमारे सहा लाख मिळकती आता नऊ लाखा मिळकती झाल्या आहेत. शहरात नवीन बांधकाम करायचे असेल तर महापालिकेच्या बांधकाम विभागाची परवानगी घ्यावी लागते. मात्र, ग क्षेत्रीय हद्दीत अनेकांनी परवानगी न घेता अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरु केली आहेत. आता निवडणुकीचा हंगाम येतोय, त्यामुळे अनधिकृत बांधकामाचे पेव जोरात सुरु आहे.




### थेरगाव, काळेवाडी बेकायदा बांधकामे जोमात

**» पिंपरी, थेरगाव, काळेवाडी भागात भारत माता चौकाचा अंतर्गत भाग, जोतिबानगर, थेरगाव, नखाते वस्ती जवळील परिसर, विजयनगरचा अंतर्गत भाग, पिंपरी गावठाण, पिंपरी कॅम्प, तापकीर चौक-साई मल्हार कॉलनी, साईराज कॉलनी या भागांत अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात आहेत. तसेच छत्रपती शिवाजी चौक ते रहाटणी फाट्यापर्यंत दोन्ही बाजूंनी असलेली अतिक्रमणे, नखाते वस्ती भागात व रहाटणी फाटा, जोतिबानगर या भागात भाजी विक्रेते व व्यावसायिकांचे रस्त्यावरील अतिक्रमणे आहेत. पिंपरी कॅम्पात तर ग्राहकांना चालताही येत नाही इतकी अतिक्रमणे आहेत. पण, अधिकाऱ्यांचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असते, असा आरोप नागरिकांकडून होत आहे.**

महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत काळेवाडी, थेरगाव, पिंपरी गाव, कॅम्प या परिसरांत अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे वाढली आहेत. केवळ संबंधित अधिका-याचे लागेबंधे आणि 'देवाणघेवाण' असलेली बांधकामा अभय दिले जात आहे.

काळेवाडी-रहाटणी गावठाण परिसर हा प्रभाग क्रमांक २७ चा भाग, थेरगाव-दत्तनगर, गणेशनगर परिसर हा प्रभाग क्रमांक २४ चा भाग, थेरगाव गावठाण-पडवळनगर, अशोका सोसायटी हा प्रभाग क्रमांक २३ चा भाग, पिंपरी गाव-मिलिंदनगर, संजय गांधीनगर व पिंपरी कॅम्प परिसर हा प्रभाग क्रमांक २१ चा भाग यांचा समावेश आहे.

या भागांत शहराच्या तुलनेत अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे वाढली आहे. महापालिका निवडणुकांची लगबग सुरू आहे. या काळात अधिकारी कामकाजात व्यस्त असतात व कोणी तक्रार केली, तरी अधिकाऱ्यांना निवडणुकीच्या कामांचे कारण द्यायला असते. त्यातच पोलिस बंदोबस्त मिळत नाही, असे कारण देऊनही संगनमताने दुर्लक्ष केले जात आहे.

### अजित पवारांच्या सूचनेकडेही दुर्लक्ष...

**» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चिंचवड मतदारसंघात १५ ऑक्टोबरला जनसंवाद सभा घेतली होती. त्या जनसंवाद सभेच्या आधी त्यांनी पिंपळे सौदागर परिसरात पाहणी करतांना रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यासाठी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांना सूचना केल्या होत्या. मात्र, त्यांनी केलेल्या सूचनांकडेही महापालिका अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे.**

> **"थेरगाव, काळेवाडी परिसरात एक ते दीड लाख अनधिकृत बांधकामे असतील. पत्राशेड, गोदामे, गाळे व छोट्या इमारती या स्वरूपाची अनधिकृत बांधकामे आहेत, हे अधिका-यांना माहिती आहे. ते प्रत्येकजण पैसे घेऊन डोळेझाक करतात. क्षेत्रीय अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले असतात. त्यांना शहराबाबत काही देणेघेणे नसते. केवळ संपत्ती गोळा करून ते तीन वर्षांनी जातात. बीट निरीक्षक त्यांचे काम चोखपणे करत नाहीत, उलट कारवाईची भीती दाखवून पैसे उकळले जातात."**
>
> **- संजय गायखे, सामाजिक कार्यकर्ते**

# एकाच ठिकाणी मतदान करण्याची 'विक्रमी शपथ' घेत मतदान करण्याचा केला निर्धार..!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सुमारे 38 हजार 340 जणांनी मतदान करण्याची विक्रमी शपथ घेतली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने आज सुमारे ३८ हजार ३४० जणांनी मतदान करण्याची विक्रमी शपथ घेतली.

मोशी येथील जगातील सर्वात मोठ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' स्मारकाला मानवंदना देण्यासाठी आज पिंपरी चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, डब्ल्यूटीई फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रिव्हर सायक्लोथॉन २०२५'स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांमध्ये मतदानाबाबत जागृतीसाठी 'मतदान शपथ' देण्याचा विशेष उपक्रम महापालिकेने स्वीप उपक्रमांतर्गत आयोजित केला होता.



यावेळी आमदार महेश लांडगे, विधान परिषद सदस्य अमित गोरखे यांच्यासह महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, तसेच अतिरिक्त पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपआयुक्त शिवाजी पवार, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ.प्रदीप ठेंगल, माजी नगरसदस्य व माजी नगरसदस्या यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, स्वयंसेवक यांच्यासह तब्बल ३८ हजार स्पर्धक, नागरिक या उपक्रमात सहभागी झाले होते.

### मतदानाची विक्रमी शपथ...

**» "आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, " अशी शपथ यावेळी उपस्थितांनी मान्यवरांच्या उपस्थितीत घेतली.जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.**

> **पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने निवडणुकीकरीता स्वीप उपक्रमांतर्गत स्वीप व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे, त्याचाच एक भाग म्हणून आजचा हा मतदान जनजागृतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.येत्या निवडणुकीत शहरातील सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा.**
>
> **- श्रावण हर्डीकर, आयुक्त तथा प्रशासक.**

# पुणे महापालिकेला 2 कोटी 81 लाखांचा भुर्दंड?

## महापालिकेचा बायो सीएनजी प्रकल्प बंद ठेवण्याचा आदेश दिल्याने पुणे महापालिकेला भुर्दंड पडल्याचा दावा करण्यात आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सूस येथील महापालिकेचा बायो सीएनजी प्रकल्प बंद ठेवण्याचा आदेश दिल्याने पुणे महापालिकेला दोन कोटी ८१ लाख रुपयांचा भुर्दंड पडल्याचा दावा करण्यात आला आहे. वर्षभर हा प्रकल्प बंद ठेवल्यामुळे संबंधित ठेकेदार कंपनीला नुकसान भरपाईपोटी ही रक्कम देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केला आहे.

सूस परिसरात ओल्या कचऱ्यापासून बायो सीएनजी तयार करण्याचा प्रकल्प महापालिकेने सुरू केला. एका कंपनीला हा प्रकल्प चालविण्यासाठी देण्यात आला. या प्रकल्पामुळे या परिसरात दुर्गंधी येत असल्याने प्रकल्प बंद करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली. त्यासाठी आंदोलनही करण्यात आले. स्थानिक नागरिकांनी न्यायालयात दाद मागितली. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात न्यायालयाने निकाल देऊन प्रकल्पातून येणारी दुर्गंधी थांबविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना महापालिकेला दिल्या.

नागरिकांनी याबाबत एका भाजप नेत्याची भेट घेऊन समस्या मांडली. त्यानंतर नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन भाजपच्या नेत्याने हा प्रकल्प बंद ठेवावा, असा आदेश महापालिका प्रशासनाला दिला. महापालिकेने जानेवारी २०२४ ते २०२५ या काळात हा प्रकल्प बंद ठेवला. त्या पोटी संबंधित ठेकेदार कंपनीने नुकसान भरपाई देण्याबाबतचे पत्र महापालिका प्रशासनाला दिले.

हा प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकाकडून महापालिकेकडे सहा ते सात कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी चौकशी समिती नेमली. चौकशी समितीने केलेल्या तपासणीनंतर दोन कोटी ८१ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे निश्चित करण्यात आले. वर्गीकरणाच्या माध्यमातून ही रक्कम ठेकेदाराला देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला होता. या प्रस्तावाला स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

हा प्रकल्प कमी क्षमतेमध्ये चालविला जात असल्याने जानेवारी २०२४ ते जून २०२५ दरम्यान ही प्रक्रिया मंद गतीनेच होत राहिली. यामुळे जे नुकसान झाले त्याची भरपाई महापालिकेने करावी, यासाठी ठेकेदार कंपनीच्या वतीने महापालिकेला पत्र देण्यात आले होते, असे घनकचरा विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.



### ठेकेदार कंपनीच्या वतीने महापालिकेला पत्र

» हा प्रकल्प कमी क्षमतेमध्ये चालविला जात असल्याने जानेवारी २०२४ ते जून २०२५ दरम्यान ही प्रक्रिया मंद गतीनेच होत राहिली. यामुळे जे नुकसान झाले त्याची भरपाई महापालिकेने करावी, यासाठी ठेकेदार कंपनीच्या वतीने महापालिकेला पत्र देण्यात आले होते, असे घनकचरा विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

### नुकसान भरपाई देण्याचे निश्चित

» हा प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकाकडून महापालिकेकडे सहा ते सात कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी चौकशी समिती नेमली. चौकशी समितीने केलेल्या तपासणीनंतर दोन कोटी ८१ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे निश्चित करण्यात आले. वर्गीकरणाच्या माध्यमातून ही रक्कम ठेकेदाराला देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला होता. या प्रस्तावाला स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

### नागरिकांच्या तक्रारींची दखल

» नागरिकांनी याबाबत एका भाजप नेत्याची भेट घेऊन समस्या मांडली. त्यानंतर नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन भाजपच्या नेत्याने हा प्रकल्प बंद ठेवावा, असा आदेश महापालिका प्रशासनाला दिला. महापालिकेने जानेवारी २०२४ ते २०२५ या काळात हा प्रकल्प बंद ठेवला. त्या पोटी संबंधित ठेकेदार कंपनीने नुकसान भरपाई देण्याबाबतचे पत्र महापालिका प्रशासनाला दिले.

# खडकवासला पवना धरणातील दारूभट्या उद्ध्वस्त; रिसॉर्ट फार्महाऊसही जमिनदोस्त

## खडकवासला पवना धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील बेकायदा दारूभट्यांसह, 20 गुंठे जागेवरील रिसॉर्टसह फार्महाऊस जमिनदोस्त करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील खडकवासला पवना धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील बेकायदा दारूभट्यांसह, एका बड्या नेत्याच्या नातेवाईकाने उभारलेल्या २० गुंठे जागेवरील रिसॉर्टसह फार्महाऊस जमिनदोस्त करण्यात आले आहे. धमक्या आणि राजकीय दबावाला बळी न पडता जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाने ही कारवाई केली आहे. दरम्यान खडकवासला पानशेत वरसगाव कासारसाई पवना या जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील किमान ३०० अतिक्रमणे आणि बेकायदा बांधकामे हटविण्यात आली आहेत.

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली आहेत. या परिसरात रिसॉर्ट, फार्महाऊस बांधण्यात आले आहेत. ही सर्व बांधकामे अनाधिकृत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी अनेक नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. मात्र कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातही धरण परिसरातील अतिक्रमणे आणि अनाधिकृत बांधकामाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या संदर्भात कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते

त्यानंतर गेल्या काही दिवसापासून धरण बाण कोट परिसरात कारवाई सुरू झाली. ही कारवाई रोखण्यासाठी राजकीय दबाव जिल्हा प्रशासनासह जलसंपदा विभागावर होती. मात्र त्याला न जुमनता ही धडक कारवाई करण्यात आली.

खडकवासला धरण परिसरातील एका भागात स्वतःच्या मालकीची १२ गुंठे जमीन असताना एका बड्या नेत्याच्या नातेवाईकाने ३२ गुंठे जागेवर रिसॉर्ट उभारले होते. ते उभारताना वीस गुंठे जमिनीवर अतिक्रमण केल्याची तक्रार होती. त्यानुसार हे अतिक्रमण जमिनदोस्त करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. तसेच तीस वर्षांपासून असलेल्या दारूभट्ट्या ही उद्ध्वस्त करण्यात आल्या. दरम्यान खडकवासला धरण परिसरातील सुमारे १०० अतिक्रमणांवर पानशेतमध्ये ३०, पवनातील १२, वरसगाव येथील पाच अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच हिंगणे, स्वारगेट, वडगाव बुद्रुक, हडपसर, नीरा उजवा कालवा या भागातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.




> जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली असून ३०० अतिक्रमणे बेकायदा बांधकामे हटविण्यात आली आहेत. ही कारवाई पुढील काही दिवस सुरूच राहिल.
>
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी

# पानशेत–राजगड परिसरात बिबट्यांचा वाढता विळखा

## निधीअभावी वन विभाग असहाय; वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिक व पर्यटक चिंतेत

**पुणे | प्रतिनिधी**

शिरुर, जुन्नरप्रमाणे राजगड तालुक्यात आणि रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील पानशेत खोऱ्यासह बिबट्यांची संख्या वाढली आहे. या परिसरात पन्नासहून अधिक बिबट्यांची संख्या झाल्याने नागरिकांसह वन विभागाची चिंता वाढली आहे. येथे मनुष्यहानी होत नसली तरी पाळीव प्राण्यांच्या शिकारीचे प्रमाण वाढले आहे

गेल्या वर्षभरात बिबट्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडणाऱ्या पाळीव जनावरांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे तर दोन वर्षात बिबट्यांची संख्या दुप्पटीने वाढली आहे. जनावरांचे गोठे, कंपन्या, फार्महाऊससह थेट लोकवस्त्यांत बिबट्या शिरुन कुत्री, वासरे, शेळ्या, मेंढ्या, गाई, बैल अशा जनावरांचा फडशा पाडत आहे. त्यामुळे गेल्या दोन-तीन महिन्यांत सर्वत्र बिबट्यांची दहशत वाढली आहे. एकीकडे या भागात बिबट्यांची संख्या वाढत आहे. तर दुसरीकडे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची राजगड तालुका वन विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे आवश्यक यंत्रसामग्री, साधने नाहीत असे गंभीर चित्र पुढे आले आहे.

राजगड तालुका वन परिक्षेत्र अधिकारी अनिल लांडगे म्हणाले, तालुक्यात पन्नासहून अधिक बिबटे असल्याचे प्राथमिक पाहणीत आढळून आले आहे. बिबट्यांची नेमकी संख्या मोजण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे ड्रोन कॅमेरे व इतर साधने उपलब्ध नाहीत. गेल्या सहा महिन्यांत बिबट्यांच्या हल्ल्यात तालुक्यात 57 गायी, वासरे, शेळ्या, मेंढ्या अशी जनावरे मृत्युमुखी पडली. तसेच मुत्युमुखी पडलेल्या जनावरांची साडेसहा लाख रुपयांची भरपाई संबंधित शेतकऱ्यांना देण्यात आली आहे.

या परिसरात वन विभागाचे जवळपास दहा हजार हेक्टरहून अधिक वनक्षेत्र आहे. उंच डोंगररांगा, घनदाट जंगल आणि गर्द झाडी- झुडपांनी वेढल्या आहेत. त्यामुळे बिबट्यांसह तरस, रानकुत्री असे हिंस्र वन्यप्राण्यांचा अधिवास या जंगलात वाढला आहे. कोकणापर्यंत दाट जंगलाचा विस्तार असल्याने हरीण, चितळ सांबर, रानगवे आदी वन्यजीवांचा अधिवासही येथे आढळून येतो.



### यंदा निधीच मिळाला नाही

» पुणे जिल्हा नियोजन मंडळाच्या वतीने दरवर्षी पुणे वन विभागाला देण्यात येणारा निधी यंदा वर्ष संपत आले तरी मिळालेला नाही. त्यामुळे बिबट्यांची संख्या, हल्ले वाढले असतानाही वन विभागाला प्रभावीपणे उपाययोजना करण्यात अडचणी येत आहेत.

### बिबट्यांना पोषक जंगल

» राज्यातील अतिदुर्गम तालुका असलेल्या राजगड सह्याद्रीच्या उंच डोंगररांगात वसला आहे. सिंहगड किल्ल्याच्या पश्चिमेपासून तोरणा, राजगड असे गडकोटांचा अतिदुर्गम भागापासून रायगड जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत तालुक्याचा विस्तार आहे. या परिसरात वन विभागाचे जवळपास दहा हजार हेक्टरहून अधिक वनक्षेत्र आहे. उंच डोंगररांगा, घनदाट जंगल आणि गर्द झाडी- झुडपांनी वेढल्या आहेत. त्यामुळे बिबट्यांसह तरस, रानकुत्री असे हिंस्र वन्यप्राण्यांचा अधिवास या जंगलात वाढला आहे. कोकणापर्यंत दाट जंगलाचा विस्तार असल्याने हरीण, चितळ सांबर, रानगवे आदी वन्यजीवांचा अधिवासही येथे आढळून येतो.

“ बिबट्यांचा धुमाकूळ वाढल्याने राजगड तालुक्यातील पर्यटनावर परिणाम झाला आहे. यंदा दिवाळीच्या सुट्टीत पानशेत वरसगाव धरण परिसरासह मढे घाट, राजगड, तोरणा किल्ल्यावर पर्यटकांची संख्या कमी झाली होती. सध्या पर्यटनाचा हंगाम सुरू आहे, मात्र बिबट्यांच्या दहशतीमुळे रात्री मुक्कामी थांबणे पर्यटक टाळत असल्याचे चित्र आहे. सिंहगड, पानशेत भागात शनिवारी तसेच रविवारी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. मात्र सध्या वीस ते पंचवीस टक्के पर्यटक कमी झाले आहेत.

- समाधान पाटील, वन परिमंडळ अधिकारी, सिंहगड वन विभाग

# विकासासाठी राष्ट्रवादीला साथ द्या : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

## "सर्व उमेदवारांना विक्रमी मतांनी विजयी करा," असे जोरदार आवाहन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

**पुणे | प्रतिनिधी**

“इंदापूरचा चेहरा मोहरा बदलणे हा आमचा संकल्प आणि जबाबदारी.टीका-टिप्पणींना उत्तर देण्यात वेळ दवडणार नाही.आम्ही विकास केला आहे,करीत आहोत आणि पुढील चार वर्षे तालुक्याचा आमदार म्हणून आणखी मोठी कामगिरी करणार आहोत. इंदापूरच्या प्रगतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार भरत शहा आणि सर्व उमेदवारांना विक्रमी मतांनी विजयी करा," असे जोरदार आवाहन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते डॉ. शशिकांत तरंगे, तालुका अध्यक्ष हनुमंत कोकाटे, उज्ज्वला चौगुले, सुधीर मखरे, अशोक इजगुडे, प्रतापराव पाटील, दत्तात्रय घोगरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रचार सभेत महात्मा फुले नगर व दर्गा मजीद चौकात कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे यांनी विरोधकांना उत्तर देत विकासाची यादीच मांडली.

पुढे बोलताना कृषिमंत्री भरणे म्हणाले, अकरा वर्षांचे काम बघा; फक्त बोलण्याची नाही, प्रत्यक्ष कामाची राजकारणशैली आहे. इंदापूरकरांनी दिलेला मान हा गाजावाजा करण्यासाठी नाही. अकरा वर्षांतील इंदापूर शहराचा कायापालट पाहा. रस्ते,ड्रेनेज, पाणीपुरवठा,शहरातील प्रभागनिहाय विकास या सर्वांना कोट्यवधींचा निधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणला. हे काम विरोधकांच्या काळात का झालं नाही? हा प्रश्न मतदारांनी विचारायलाच हवा."

कुगाव–शिरसोडी पुलाबाबत ते म्हणाले,"व्यापारी संघाच्या निवेदनाची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दखल घेतली. निधी मंजूर केला.शहराच्या वाढीला नवी दिशा देणारा हा पूल दीड वर्षात उभा राहणार आहे. इंदापूरचे मार्केट पाचपट वाढेल.



### नगराध्यक्ष अंकिता शहा यांच्या कार्यकाळाचे कौतुक

» मागील पाच वर्षांत नगराध्यक्ष अंकिता भाभी शहा आणि त्यांच्या टीमने इंदापूर शहराला नवी ऊर्जा दिली.भुयार गटार, ड्रेनेज, पालिकेची नवी इमारतया साठी मी 10 कोटींचा निधी दिला.स्पर्धा परीक्षेची 5 कोटींची अद्ययावत लायब्ररी दिली. ऊर्जा प्रकल्प, शॉपिंग कॉम्प्लेक्स, तलाव विकास, बाबा चौक–स्मशानभूमी रस्ता, दर्गा–शिवली संवर्धन ही सर्व कामे राष्ट्रवादीच्या खांद्यावर उभी आहेत.सत्ता हातात असताना विकासाचा एकही पत्ता दाखवू न शकणारे आता मोठ्या आवाजात बोलतात.इंदापूरकरांनी शांत राहून विचार करा. विकास दिसतोय तो कुणाचा? उत्तर स्पष्ट आहे,राष्ट्रवादी काँग्रेसचा," असा जोरदार टोला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी लगावला.